# धम्मपदाच्या प्रकाशात - बुद्धाची नैतिक व वैचारिक क्रांती

**डॉ. स्निग्धा एस. सदाफळे**
सहयोगी प्राध्यापिका, तथा विभागप्रमुख,
पाली व प्राकृत विभाग डॉ. आंबेडकर महाविद्यालय,
चंद्रपूर. (महाराष्ट्र) 442 402.
Mail- snigdha210675@gmail.com Cont. 9673309784.

**सारांश**

भारतीय तत्त्वज्ञान व समाज जीवनात क्रांती घडवून आणणारे साहित्य म्हणजे तिपिटक यात गौतम बुद्धाचे दर्शन,तत्त्वज्ञान व शिकवण आहे. बुद्धाच्या शब्दा शब्दातच क्रांती दिसून येते.मानवी अविद्या दूर करण्यासाठी त्यांनी धम्म दिला. धम्म म्हणजे बुद्धाची शिकवण. धम्मचे अनेक अर्थ लावले जातात. सत्य, अंतिम ध्येय,नियम, सदाचरण व सर्वोच्च ज्ञान असे धम्म शब्दाचे वेगवेगळे अर्थ आपणास दिसून येतात. ही अर्थ सांगण्यासाठीच अनेक स्पष्टीकरणे दिसून येतात, धम्माचा अर्थ अनुशासन असा देखील काही ठिकाणी घेतला दिसून येतो. जातक ग्रंथानुसार माणसाला सत्य जाणायचे असेल तर त्याला स्वतःला अनुशासित करावे लागते . माणसात शिकण्याची क्षमता असली पाहिजे, पूर्वग्रहसोडून,कल्पनांचा त्याग करणे, या प्रक्रियेलाच धम्मात अनुशासन म्हटलेले आहे.बुद्धांच्या धम्म ग्रंथाला पालि तिपिटक असे म्हणतात. त्याचे प्रामुख्याने तीन पिटका मध्ये विभाजन होते.त्यापैकी सुत्तपिटकाचे पुन्हा पाच निकाया मध्ये विभाजन होते. या पाच निकाया पैकी शेवटचा जो खुद्दक निकाय आहे त्याचे 15 स्वतंत्र ग्रंथआहेत.तिपिटकातील सुत्त पिटकाच्या खुद्दकनिकायातील दुसऱ्या क्रमांकाचा अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथ म्हणजे धम्मपद होय.

***बीज शब्द-*** *तिपिटक, गौतम बुद्ध, धम्मपद, वैचारिक क्रांती*

**धम्म पदाचा अर्थ -**

"धम्म म्हणजे काय मनाची शुद्धी निरोगीमन, काये ची शुद्धी निरोगी शरीर व वाचेची शुद्धी निरोगी वाच्या या तिन्ही प्रकारच्या शुद्धी करण्याच्या शाखाला, ज्ञानाला, धम्म म्हणतात"[1] धम्मपद म्हणजे सदाचरण चांगले मानवी आचरण. धम्म म्हणजे सत्य आणि पद म्हणजे मार्ग. सत्याचा मार्ग या अर्थाने धम्मपदा चा अर्थ होतो " धम्मपद शब्द का अर्थ है धम्म संबंधी 'पद' या 'शब्द' 'पद 'शब्द का अर्थ वाक्य या गाथा की पंगती भी होता है!"[2] तथागताचा धम्म म्हणजे त्याची शिकवण एका मानवाने दुसऱ्या मानवाशी कसे वागावे याची तात्विक जाणीव म्हणजे धम्म. त्यानुसार आचरण करणे म्हणजे

मार्ग,सदाचाराचा मार्ग " धम्मपद म्हणजे धर्मविषयक पद किंवा शब्द पण येथे पद शब्द वाक्य गाथा पंगती किंवा श्लोक पदे इतक्या व्यापक अर्थी वापरला आहे "[3]

**धम्मपद ग्रंथाचा उगम** -

बुद्धांनी जी काही नीतिमूल्य तत्वज्ञान सांगितली शिकवण दिली ती तिपिटकात संकलित आहे. बुद्ध हयातीत ते मौखिकस्वरूपात होते. त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर पहिल्या धम्म संगीततीत तिपिटकाचे संगायन होऊन मौखिक स्वरूपात ते अस्तित्वात आले.पुढे श्रीलंकेचा राजा वट्ट-गामिनी अभय याच्या काळात तिपिटक लिपीबद्ध करण्यात आले. सुत्तपिटकाच्या निर्मितीस भन्ते आनंदाने जबाबदारी पूर्ण केली. बुद्धांचा हा इतिहास व वचने त्यांनी यथायोग्य प्रस्तुत केली.म्हणून इतिहास नेहमीच भन्ते आनंदाचा ऋणी राहील. सुत्त पिटकाचे पाच निकाय आहेत. त्यातील शेवटचा खुद्दकनिकाय याचे 15 स्वतंत्र ग्रंथ आहेत. दुसऱ्या क्रमांकाचे धम्मपद हा ग्रंथ तील संपूर्ण पद्यमय गाथांचा एक वेगळे संकलन करण्यात आले, त्यातच धम्मपदाचा उगम झाला. नीती विषयक सुभाषितांचा हा संग्रह आहे. धम्मपदाच्या उपदेशाचे प्रमुख क्षेत्र मानवी मन आहे. मनात जे काही भाव विचार भावना निर्माण होतात त्यानुसारच आपले भावविश्वकार्यान्वित होते.विचारांप्रमाणेच मनुष्य वागायला लागतो. मन हे दुधारी शस्त्र आहे.त्यानेच जिंकता येते, त्यालाच जिंकता येते. धम्मपदात एकूण 26 वर्ग असून 423 गाथांचा संग्रह आहे. या 423 गाथांमधून प्रज्ञा,शील, समाधी, निबान, इत्यादी मोठ्या सुलभतेने सरलतेने वर्णन केलेले आढळते. जे वाचकांना अद्भुत, संवेग, धम्मरस, शांती, ज्ञान आणि भाव संसाराचे अनुभव येतात.

**धम्मपदाची विषय वास्तू-**

धम्मपदात एकूण 26 वर्ग असून 423 गाथा मध्ये संकलन करण्यात आलेले आहे. धम्म पदाच्या या पद्य ग्रंथात मानवी नीती मूल्यांचे, नैतिकतेचे सर्व अंग दिसून येतात. ज्यामुळे मनुष्य पशुतुल्य जीवन सोडून आदर्श जीवन,मानव म्हणून योग्य मार्गाने जाऊन दुःख मुक्त होऊ शकतो.सोबतच इतरांना देखील तो या मार्गावर नेऊ शकतो. "धम्मपद की विषय वास्तू के स्वरूप का जो परिचय दिया है उसे स्पष्ट है की उसमे नीती के वे सभी आदर्श संग्रहित हे जो भारतीय संस्कृतीवर समाज की समान संपत्ती है "[4]

**धम्मपद ग्रंथाचे महत्त्व** -

"एक पुस्तक को और केवल एक पुस्तक को जीवनभर साथी बनाने की यदी आपकी इच्छा हुई तो विश्व के पुस्तकालय मे आपको धम्मपद से बेहतर दुसरी पुस्तक मिलना कठीण है "[5]

अल्बर्ट जे ऍडमनड धम्मपदाच्या त्याच्या अनुवादीत ग्रंथाच्या प्रस्तावनेत लिहितात, " **जर आशिया खंडात कधी कोणत्या अविनाशी ग्रंथाची रचना झाली असेल तर तो फक्त धम्म धम्मपद ग्रंथ होय** "

"मानवी मनात सर्व गोष्टीचा उगम होतो आणि मन हे सर्व काही घडवण्यास कारणीभूत ठरते "[6]

धम्मपदातील वैचारिक विचारामुळे अनेकांच्या चिंतनात अमुलाग्रक बदल घडून आली. त्यामुळे अनेक

चिनी यात्री भारतात या बुद्धभूमीला वंदन करण्यास आले.” धम्मपद एक ऐसा ग्रंथ है जिसकी प्रत्येक गाथा बुद्ध धम्म का सार भरा हुआ है, जिंन गाथावो को सुनकर आज तक विश्व के अगणित दुःख सनतप्त प्राणियों का उद्धार हुआ है “[7]

धम्मपद ग्रंथात फक्त दोन ठिकाणीच धम्मपद शब्दाचा उल्लेख आलेला आहे. पुष्पवग्ग व भिकखुवग्ग यात, संयुक्त निकायात पियकरसुत्त यात देखील धम्मपद याच अर्थाने धम्मपदाचा उल्लेख येतो. मिलिंद प्रश्न ग्रंथात देखील धम्मपद याचा वारंवार उल्लेख येतो. धम्मपदाचा प्रथम पालीतून हिंदी अनुवाद हा 1908 मध्ये भदंत  चंद्रमणी महास्थवीर यांनी केला. ज्याप्रमाणे महाकाव्य महाभारतातील छोटे परंतु अमूल्य कृती भगवद्गीता आहे त्याच प्रमाने तिपिटकाचा धम्मपद अत्यंत प्राचीन महत्त्व अमूल्य असा छोटासा ग्रंथ आहे

**धम्मपद एक नैतिक व वैचारिक क्रांती -**

बुद्धाने इसवी सन पूर्व सहाव्या शतकात समाजाला नैतिक चळवळीत एक वेगळ्या परिवर्तनाला चालना दिल्याने क्रांती निर्माण झाली.इसवी सन पूर्व सहाव्या शतकात आत्मा व मोक्ष याकरिता श्रमण संस्कृतीच्या  वैचारिक बदलाने अनंत्त व  निब्बाण या दोन नवीन संकल्पना देऊन क्रांती घडवून आणली. 45 वर्ष सतत समाजात या नविन विचाराच्या पेरणीचे कार्य केले. नव विचार पेरून जागृतता निर्माण करीत, उपदेश दिले. त्याचे संकलन तिपिटक ग्रंथात करण्यात आले. काही ठिकाणी व मिश्र अशा लोकभाषेत त्यांनी उपदेश दिलेत. त्यातील पद्यमय गाथांचा समावेश धम्मपद या ग्रंथात होतो. धम्मपद हे अमूल्य रत्नांचा खजिना आहे. मानवी उत्थानासाठी त्याचा योग्य अशा जीवन जगण्याच्या प्रयत्नसाठी  योग्य असे मार्गदर्शक आहे.मानवाने मानवाशी कसा व्यवहार करावा याचे उदात्त उदाहरण धम्मपद या ग्रंथात आहे. 423 गाथा या अनुभवजन्य आहेत. कल्पनेला त्यात थारा नाही. मनुष्याला प्रगतीसाठी, दुःखमुक्त अवस्था प्राप्त करण्यासाठी, श्रामण्याचे रहस्य येथे सांगितलेले आहे. वैराणे वैर शांत होत नाही,तर अवैराने संपते. हा सनातन धम्म इतका नैतिक व उद्धात विचार देऊन मानवी जीवनातून शत्रुत्वाची भावना नष्ट करण्याचा मार्ग दिला. धम्मपदग्रंथ  हा केवळ ग्रंथ न राहता तो मानवाला सम्यक योग्य दिशा देणारी एक महान नैतिक विचार क्रांतीच होय.

**धम्मपद बुद्धाची वैचारिक क्रांती-**

इसवी सन पूर्व सहावे शतकात बुद्धाने जे समाजात विचार मांडले ते त्या काळातील समाज व्यवस्थेला थेट आव्हान देणारे होते. धम्मपद हे त्याच्या या क्रांतिकारी विचाराचे सार स्वरूप आहे. परमेश्वर, आत्मा, पुनर्जन्म,पुव कर्म ने जे काही घडत नाही तर सर्व बाबी मानवी जीवनात मनापासून सुरू होतात. विकृत मनाने दुःख येते तर शुद्ध मनाने सुख येते. हे मनोविचार आणि स्व नियंत्रणाची क्रांती बुद्धा नेकेली.त्याचप्रमाणे मानवी जीवनात यज्ञ,बली, कर्मकांड, वर्णभेद यांनी सुख येणार नाही. तर स्वतःच्या

शुद्ध विचार- आचरणा वरती अवलंबून आहे.योग्य कर्म केल्यानेच सुख प्राप्त होते. दुःखमुक्तीचा मार्गाने दिला, सोबतच तत्कालीन समाजमनात आत्मा एवेजी अनंत्त ही संकल्पना दिली, तर मोक्ष हा मृत्यूनंतर मिळणारी स्थिती परंतु याच जीवनात जिवंतपणे निब्बानाचे ध्येय देऊन, मानवाला बुद्धांनी सुखी केले. त्याचप्रमाणे सर्व प्राणी समान वर्ण, लिंग भेद, जाती यांचा भेद नाकारून, समता व उपेक्खा, अहिंसेचा पुरस्कार त्याने शिकविला, सोबतच अंधश्रद्धा, कर्मकाड एवजी प्रत्यक्ष अनुभव आणि प्रज्ञेला महत्त्व दिले. हे सर्व विचार नव्या दृष्टिकोनाची निर्मिती  व रूजवन होती.

धम्म पद या ग्रंथाने समाजातील जुन्या विचारात बदल घडवून आणले त्यामुळे अंधश्रद्धेमुळे अंधार दूर जाऊन विवेक निर्माण झाला लोक तरक आणि चिंतनाने विचारपूर्वक निर्णय घेऊ लागले समान तिचा विचाराला माणूस म्हणून माणसाला वागणूक देऊ लागले वर्ण जाती स्त्री रंग इत्यादी वर आधारित विचार कमी झाले माणूस कर्मामुळे श्रेष्ठ ही विचारधारा निर्माण होऊ लागली सत्य अहिंसा संयमशील या नैतिक मूल्यांमुळे विचारात बदल घडवून वर्तनातही बदल घडलेत राग द्वेष मोह न व अज्ञान यापासून मुक्त होण्यास मानवाला वाव मिळाला स्वतःवर विश्वास परिश्रम व प्रगती मनुष्याला साधता आली.

**निष्कर्ष –**

धम्मपदा ग्रंथ विचार प्रवर्त ग्रंथ असून तथागत गौतम बुद्धाने जी दुख मुक्त अवस्थेसाठी शिकवण दिली त्याचा सार धम्मपद ग्रंथांमध्ये आहे समाजातील अनिष्ट रूढी परंपरा अंधश्रद्धा वर्णव्यवस्था ज्याचक धार्मिक नियम यांना आव्हान धम्मपद ग्रंथाने दिले यज्ञ या बली वर्णभेद यावर आधारित समाज रचनेत माणसाला फारसे महत्त्व नव्हते बुद्धाने माणसाला केंद्रभूत केले कर्माने तो श्रेष्ठ ठरतो धर्माने नाही ही शिकवण दिली मन ही संकल्पना आत्मा या संकल्पनेच्या तुलनेत शिकवली मन सर्व गोष्टीचे मूळ म्हणून त्याला संयमी शिक्षित केले तर समाज सुखी समाधानी होईल हा विचार दिला योग्य कर्म विचार आल्यामुळे संघर्ष कलह कमी होऊन दुखाचे कारण नष्ट होऊन नवीन विचारसरणी धम्मपदामुळे समाजात निर्माण झाले चार ब्रह्म विहार मैत्री, करुणा, मोदिता, उपेक्षा ही गुण समाजात विकसित झाले शत्रुत्व सूड जाऊन समाज मनात प्रेम करुणा अहिंसा हा विचार समाज मनःपटलावर कोरल्या गेला धम्मपद सामान्य माणसांसाठी समजण्यास सोपे आहे.  पाली या बोल भाषेत लोक भाषेत जनकल्याणकारी असे हे तत्त्वज्ञान तथागताने धार्मिक सामाजिक व नैतिक क्षेत्रात अमुलाग्र बदल घडून आणण्यासाठी समाजाला नवी विचारधारा दिली. नैतिक व वैचारिक क्रांतीस तत्कालीन समाजात निर्माण केली. बुद्ध धर्म संपूर्ण विश्वात पोहोचला, मानव वाचेलौकिक पारलौकिक सार्वभौमतेची सौंदर्य धम्मपदाच्या गाथेमुळे अधिक खुलतात म्हणूनच धम्मपद हे एक वैचारिक क्रांती होय असे माझे मत आहे.

सुदर्शन निबंधात धम्मपदाच्या प्रकाशात बुद्धाची नैतिक व वैचारिक क्रांती या विषयाच्या अभ्यास करण्यात आला आहे पाली भाषेतील धम्मपद हा गौतम बुद्धाच्या शिकवणुकीचा सार ग्रंथ असून त्यामध्ये नैतिकता विवेक आणि करुणा यावर आधारित जीवनदर्शन आले आहे विचार वर्तक तत्त्वज्ञान आले आहे बुद्धांनी कर्मकांड अंधश्रद्धा वर्णव्यवस्था जातीव्यवस्था दैववाद यांना नाकारून प्रज्ञाशील समाधी यातील सूत्रीच्या आधारे समाजात नैतिक वैचारिक परिवर्तन घडवून आणले धम्मपदातील गाथांद्वारे व्यक्तीच्या मानसिक शुद्धतेवर नैतिक आचरणावर व परिवर्तनावर भर देण्यात आलेला आहे आणि अनित्य दुःख आणि अनाथ्म या तत्त्वाच्या माध्यमातून बुद्धांनी पारंपारिक तत्वांना आव्हान देत मानव केंद्रित विचारधारा प्रस्थापित केली. या शोध लघु शोधनिबंधातून असे दिसून येते की धम्मपदातील बुद्धाची विचार कालातीत असून आधुनिक काळासाठी नैतिक व वैचारिक समाधान देणारे आहे.

**संदर्भ ग्रंथ -**

1) डॉक्टर गिरीश भगवान, बुद्धाचे आरोग्य शास्त्र, *सद्धम्म प्रकाशन अमरावती पान नंबर, 3*
2) उपाध्याय डॉक्टर भरतसिंग, *पाली साहित्य का इतिहास, हिंदी साहित्य संमेलन प्रयाग पान. नंबर 265.*
3) तगारे डॉक्टर गणेश वासुदेव, पाली साहित्याचा इतिहास, *महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे पान 159*
4) डॉक्टर विमल चरण, *हिस्टरी ऑफ पाली लिटरेचर पान नंबर 214*
5) कौशल्यान डॉक्टर आनंद, धम्मपद, *बुद्धभूमी प्रकाशन नागपूर पान नंबर 5*
6) बोधले साखरे डॉक्टर मालती, पाली साहित्यातील विचार प्रवाह, *साक्षी प्रकाशन नागपूर पेज नंबर 21*
7) भिक्षु डॉक्टर धम्मरक्षित, पाली साहित्य का इतिहास, *ज्ञानमंडळ लिमिटेड वाराणसी पान नंबर 70*